# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. ०१ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १६० ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## रब्बी पिकांच्या MSP मध्ये मोठी वाढ; केंद्र सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली :** देशातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला अधिक लाभदायक भाव मिळावा आणि रब्बी हंगामातील पिकांच्या उत्पादनाला प्रोत्साहन लाभावे, या उद्देशाने केंद्र सरकारने विपणन हंगाम 2027-28 साठी सर्व अधिदेशित रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (MSP) मोठी वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार विषयक समितीच्या बैठकीत या दरवाढीस अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे.

## फटाक्यांवर पूर्णपणे बंदी घालता येणार नाही, पण... : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली:** दिवाळीच्या काळात फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांच्या वापराबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी आगामी दिवाळीच्या काळात फटाक्यांच्या वापराबाबत संतुलित दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. तसेच परवानगी असलेल्या फटाक्यांच्या प्रकारांसाठी विशिष्ट वेळा निश्चित करण्याचे संकेत दिले आहे. न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती पी.बी. वराळे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, ते फटाक्यांच्या वापरावर पूर्ण बंदी घालण्याच्या बाजूने नाहीत, कारण त्यामुळे दिवाळी साजरी करणाऱ्या लोकांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात.

## थोडक्यात वार्ता

### राष्ट्रीय प्रतिभा शोध परीक्षा अँथे 2026 सुरू

नांदेड : स्पर्धात्मक शैक्षणिक प्रवासाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, काय अभ्यास करायचा हे जाणून घेणे हे केवळ एक समीकरण आहे. आपण कुठे आहोत, आपण काय चांगले करत आहोत आणि आपल्याला कुठे सुधारणा करण्याची गरज आहे, हे समजून घेणे तितकेच महत्त्वाचे असू शकते. तयारी आणि आत्म-जागरूकता यांमधील हीच दरी आकाश राष्ट्रीय प्रतिभा शोध परीक्षेने (अँथे) गेल्या १६ वर्षांपासून भरून काढण्याचा प्रयत्न केला आहे.

### कृषी राज्यमंत्रीकडे स्थिर धोरणाची मागणी

नाशिक - धोरणात्मक अनिश्चितता प्रकल्पांच्या फाइल्समधून रस्त्यावर आली असून, 10 राज्ये आणि 11 शहरांमध्ये राबविण्यात आलेल्या मोहिमेअंतर्गत पॉलीहाऊस शेतकऱ्यांनी एनएचबी विरोधात आंदोलन केले. शेतकरी आणि उद्योग प्रतिनिधींचे म्हणणे आहे की, जूनपासून एनएचबी ने कोणतेही नवीन पॉलीहाऊस जीओसी जारी केलेले नाही, त्यामुळे योजनेअंतर्गत अर्जदारांना प्रकल्प सुरू करता येत नाहीत. नवीन जीओसी अर्जही थांबवण्यात आले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, नवीन एनएचबी -संलग्न प्रकल्पांचा प्रवाह थांबला असून, त्यामुळे उत्पादक आणि इंस्टॉलेशन टीम्सना नवीन काम मिळत नाही. शेतकऱ्यांनी इशारा दिला आहे की, मंजुरी येण्यापूर्वी बँकेच्या कर्ज मंजुरीची मुदत संपुष्टात येऊ शकते, नव्याने मूल्यांकन करावे लागू शकते किंवा त्यांच्या अटींनुसार कर्ज रद्द होऊ शकते.

### ग्राहकांपर्यंत आणले फ्लॅगशिप दर्जाचे तंत्रज्ञान

मुंबई : सणासुदीच्या हंगामापूर्वी एआय प्लस स्मार्टफोन ने आज पल्स २ एफई, नोव्हाटॅब आणि लॅपटॅब लाँच करून आपल्या उत्पादन श्रेणीचा विस्तार जाहीर केला. संवाद, शिक्षण, मनोरंजन आणि उत्पादकता या क्षेत्रांत ग्राहकांना तीन नवे तंत्रज्ञान अनुभव मिळतील.देशभरातील ग्राहक वर्षातील तंत्रज्ञान खरेदी, अपग्रेड आणि भेटवस्तूंच्या सर्वात मोठ्या काळासाठी तयारी करत असतानाच हे लाँच होत आहे. या नव्या श्रेणीमुळे एआय प्लस स्मार्टफोन वेगवेगळ्या गरजा आणि किंमत गटांसाठी अधिक पर्याय देत आहे.

### 61,221 जणांनी घेतली सीपीआर शिकण्याची शपथ

छत्रपती संभाजीनगर : 'जीवन वाचवण्यासाठी नवी मुंबई सज्ज आहे का?' - या एका प्रश्नातून सुरु झाली एक मोठी सीपीआर प्रतिज्ञा चळवळ.नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्सने 8 जुलै ते 7 ऑगस्ट 2026 या काळात "सज्ज आहेत माझे हात" ही अभिनव मोहीम राबवली. यामध्ये अपोलोने 50,000 लोकांनी सीपीआर शिकण्याची शपथ घ्यावी तसेच वैद्यकीय आणीबाणीच्या परिस्थितीत तज्ज्ञांची मदत मिळण्यापूर्वी आपल्यापैकी सामान्य लोकांनी सज्ज राहून मदत करावी, हे लक्ष्य ठेवले होते.

### 'प्रोग्रेस दॅट पॉवर्स एव्हरीवन'च्या माध्यमातून प्रगतीचे दर्शन

बेंगळुरू: टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज आपला 'सस्टेनेबिलिटी रिपोर्ट 2026' सादर केला. 'प्रोग्रेस दॅट पॉवर्स एव्हरीवन' या संकल्पनेवर आधारित हा अहवाल टोयोटाच्या तत्त्वज्ञान, मूल्ये आणि 'प्रोड्युसिंग हॅपिनेस फॉर ऑल' या ध्येयावर आधारित आहे.टीकेएम शाश्वत मोबिलिटी, पर्यावरण संवर्धन, जबाबदार ग्राहक सहभाग, मूल्य साखळीतील सहकार्य तसेच कर्मचारी आणि समुदाय विकासाच्या माध्यमातून लोक आणि पर्यावरणासाठी सकारात्मक परिणाम आणि दीर्घकालीन मूल्य निर्माण करण्यासाठी सक्रियपणे कार्य करते. या सर्व प्रयत्नांना मजबूत प्रशासन आणि भागधारकांचा सहभाग यांची जोड आहे.

## "शाल जोडे"




# माजी अग्निवीरांना राज्यातील गणवेशधारी पदांसाठी विविध सवलती

## लेखी, शारीरिक चाचण्यांतून सूट; वयोमर्यादेत चार वर्षांपर्यंत शिथिलता

**मुंबई :** सैन्यदलातील चार वर्षांची सेवा पूर्ण करून सेवामुक्त होणाऱ्या महाराष्ट्रातील माजी अग्निवीरांना राज्याच्या गणवेशधारी सेवांमध्ये सामावून घेण्यासाठी राज्य शासनाने विविध सवलती लागू केल्या आहेत. गृह, राज्य उत्पादन शुल्क, वन आणि नगर विकास विभागांच्या अखत्यारितील गणवेशधारी 'गट-क' संवर्गातील पदांसाठी माजी अग्निवीरांना लेखी परीक्षा, शारीरिक दक्षता चाचणी आणि शारीरिक मानक चाचणीतून सूट देण्यात आली आहे. तसेच काही सेवांमध्ये कमाल वयोमर्यादेत चार वर्षांपर्यंत शिथिलता देण्याची तरतूद करण्यात आली आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय बुधवारी जारी केला आहे.

अग्निवीरांच्या चार वर्षांच्या सैन्यसेवेतून मिळालेले शिस्त, नेतृत्व आणि तांत्रिक कौशल्य राज्याच्या सेवेत वापरता यावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सचिव समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या शिफारसीनुसार माजी अग्निवीरांच्या नियुक्तीसंदर्भातील नियमावली निश्चित करण्यात आली आहे.

गृह विभागाच्या अखत्यारितील पोलीस, कारागृह, सागरी संरक्षण, गृहरक्षक दल आणि गुप्तवार्ता विभागातील, तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग, वन विभागातील वीरक्षक आणि नगर विकास विभागांतर्गत महानगरपालिकांमधील अग्निशामक अशा गणवेशधारी गट-क पदांसाठी या तरतुदी लागू राहतील. या पदांवर माजी अग्निवीरांसाठी समांतर आरक्षणाची तरतूदही करण्यात आली आहे.

ज्या शासकीय किंवा निमशासकीय गणवेशधारी सेवांमध्ये कमाल वयोमर्यादा सर्वसाधारण मर्यादेपेक्षा कमी आहे, अशा ठिकाणी माजी अग्निवीरांना कमाल चार वर्षांपर्यंत वयोमर्यादेत सवलत मिळणार आहे. मात्र, या सवलतीनंतरही अराखीव प्रवर्गासाठी ३८ वर्षे आणि राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे ही कमाल वयोमर्यादा कायम राहणार आहे.

माजी अग्निवीरांना संबंधित गणवेशधारी गट-क पदांसाठीची लेखी परीक्षा, शारीरिक दक्षता चाचणी आणि शारीरिक मानक चाचणी यामधून पूर्ण सूट देण्यात आली आहे. सैन्यदलात भरतीच्या वेळी त्यांना शारीरिक मानदंडामध्ये जी शिथिलता देण्यात आली होती, तीच शिथिलता राज्य शासनाच्या पदावर नियुक्तीच्या वेळीही ग्राह्य धरली जाणार आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागातील जवान-वाहनचालक पदासाठी आवश्यक असलेल्या वाहन चालवण्याच्या तीन वर्षांच्या अनुभवामध्ये सशस्त्र दलातील अनुभव ग्राह्य धरला जाणार आहे.

## 1.86 लाख कोटींच्या 'ग्रीन एनर्जी कॉरिडोअर-3' योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी



**नवी दिल्ली :** भारतातील बिगर-जीवाश्म (Non-fossil) उर्जा क्षमतेचा झपाट्याने विस्तार करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी एक अत्यंत मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. देशातील हरित ऊर्जा टप्प्याटप्प्याने ग्रीडला जोडण्यासाठी आणि १३५ गिगावॉट (GW) अक्षय ऊर्जा वाहून नेण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने १,८६,४०५ कोटी रुपयांच्या 'ग्रीन एनर्जी कॉरिडोअर टप्पा-३' (Green Energy Corridor-III) योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेची माहिती देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, नवीन अक्षय ऊर्जा प्रकल्पांच्या आधीच वीज वहन (ट्रान्समिशन) क्षमता तयार असणे आवश्यक आहे, जेणेकरून विजेचा अपव्यय टळेल आणि राष्ट्रीय ग्रीड मजबूत राहील.ही संपूर्ण योजना वित्तीय वर्ष २०३२-३३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. योजनेच्या एकूण १.८६ लाख कोटी रुपयांच्या खर्चापैकी १,३६,३७८ कोटी रुपये हे राज्यांतर्गत वीज वहन यंत्रणा अधिक मजबूत करण्यासाठी वापरले जातील.

## MPSC विद्यार्थ्यांचे 2 ऑक्टोबरचे आंदोलन स्थगित

**मुंबई:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभाराबाबत विविध मागण्यांसाठी २ ऑक्टोबर रोजी पुण्यात आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेल्या विद्यार्थ्यांनी हे आंदोलन स्थगित केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीत मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला. एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याबाबत प्रक्रिया सुरू करण्याबरोबरच सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली, प्रमुख अधिकाऱ्यांची चौकशी आणि यावर्षी रिक्त पदे भरण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचा दावा विद्यार्थ्यांनी केला.

एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येत होती. अध्यक्षांना पदावरून हटविण्याची प्रक्रिया सुरू होत असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. तसेच अध्यक्षांचा राजीनामा होण्यापूर्वी संबंधित प्रकरणाची तीन महिन्यांत न्यायालयीन चौकशी केली जाणार असल्याचे आश्वासन मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. काही प्रमुख अधिकाऱ्यांचीही चौकशी करण्यात येणार आहे.

एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या बदलीचे आश्वासनही विद्यार्थ्यांना देण्यात आले आहे. आयोगाच्या कामकाजाशी संबंधित अधिकाऱ्यांबाबतही आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन बैठकीत देण्यात आल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. परीक्षा पद्धतीबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. एमपीएससीच्या आगामी सर्व परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केल्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली. परीक्षेसंदर्भात 'सिंगल कार्ड' यंत्रणा उभारण्याचेही आश्वासन देण्यात आले आहे. कृषी सेवेच्या पेपरच्या तपासणीबाबतही विद्यार्थ्यांनी प्रश्न उपस्थित केले होते. या पेपरची तपासणी केली जाणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. तसेच यावर्षी विविध विभागांतील रिक्त पदे भरण्यात येतील, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करून साखर कारखाने चालू करण्याचा प्रयत्न करू नयेत, परिणाम चांगले होणार नाहीत; राजू शेट्टी

**मुंबई :** मंत्री समितीकडून 15 ऑक्टोबरनंतर राज्यात ऊस गळीत हंगाम सुरू करण्यास परवानगी देण्यात आल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये संताप असतानाच आता साखर आयुक्तांनी काढलेल्या परिपत्रकामुळे राज्यामध्ये पुन्हा एकदा शेतकरी विरुद्ध साखर कारखानदार असा संघर्ष होणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी जर अशा पद्धतीने साखर कारखाने सुरू करण्याचा प्रयत्न झाला, तर एकही कारखाना आम्ही सुरू होऊ देणार नाही, असा इशारा दिला आहे. साखर आयुक्तांकडून या पद्धतीने परिपत्रक काढणे म्हणजे केंद्राकडून साखर कारखाने सुरू करण्यासाठी वाढत असलेला दबाव असल्याचा हल्लाबोल सुद्धा राजू शेट्टी यांनी केला आहे. 15 ऑक्टोबरपासून ऊस गाळप हंगाम सुरू झाला, तर महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्यामध्ये पूर्ण क्षमतेने ऊस तयार झालेला नाही. त्यामुळे उताऱ्यामध्ये मोठा फरक पडणार असल्याने शेतकऱ्यांचं एकरी मोठं नुकसान होणार असल्याचं राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे. त्यामुळे साखर आयुक्तांनी आणि राज्य सरकारने शहाणपणा करू नये, त्यांनी साखर कारखाने चालू करण्याचा प्रयत्न केला, तर त्याचे परिणाम चांगले होणार नसल्याचा इशारासुद्धा राजू शेट्टी यांनी दिला आहे."

राजू शेट्टी म्हणाले की, मंत्रिसमितीनं 15 ऑक्टोबरनंतर साखर कारखाने सुरू करण्याचा निर्णय घेतला. तसा आदेश साखर आयुक्तांनी दिला. दरम्यानच्या काळामध्ये अचानक साखर आयुक्तांनी दुसरं एक परिपत्रक काढत 15 ऑक्टोबरपूर्वीसुद्धा 1 ऑक्टोबरनंतर क्रशिंग लायसन्स घेऊन साखर कारखाने सुरू करायला का हरकत नाही, मात्र साखर कारखाने सुरू करा असं कोणावरही सक्ती केली जाणार नाही, असं म्हटलं आहे. मग याचा अर्थ काय? याचा अर्थ साखर कारखाने चालू करण्यासंदर्भात सातत्यानं केंद्र सरकारचा दबाव वाढत चालला आहे, पण मी ठामपणानं सांगतो महाराष्ट्रातल्या कुठल्याही जिल्ह्यामध्ये, कुठल्याही तालुक्यामध्ये आजही क्षणाला 8 टक्क्यांपेक्षा जास्त रिकव्हरीचा ऊस उपलब्ध नाही.

त्यांनी सांगितले की, ज्या रिकव्हरीसाठी ज्या उसाला 12-13 टक्के रिकव्हरी लागायला पाहिजे, तिथं जर 8 टक्के लागत असेल, तर एका टनापाठीमागे 50 किलो साखरेचा थेट तोटा व्हायला लागला आहे. हे मूर्खपणाचं लक्षण आहे. त्यामुळे, सरकार जरी मूर्खपणा करत असेल, साखर कारखाने मूर्खपणा करत असतील, तर शेवटी राज्याच्या साखरेच्या उत्पादनावर त्याचा परिणाम होणार आहे, शेतकऱ्याच्या एकरी उत्पादनावर त्याचा परिणाम होणार आहे. म्हणून आम्ही गप्प बसणार नाही. कसल्याही परिस्थितीमध्ये एकही साखर कारखाना आम्ही चालू करून देणार नाही.

## दैनिक हिंदू प्रकाशवार्ता बातमीचा परिणाम; ग्रामपंचायतीची कारवाईला सुरुवात

### मोकाट कुत्र्यांचे सर्वेक्षण पूर्ण; चार ते पाच दिवसांत वाहनाद्वारे पकडून नेणार

अजिंठा प्रतिनिधी सय्यद जमीर



सिल्लोड तालुक्यातील शिवना गावात वाढलेल्या मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाबाबत दैनिक हिंदू प्रकाशवार्ता बातमी प्रकाशित होताच शिवना ग्रामपंचायतीने तातडीने दखल घेत कारवाईला सुरुवात केली आहे. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने मिशन रेबीजच्या पथकाने संपूर्ण गावात फिरून मोकाट कुत्र्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे.

याबाबत मिशन रेबीजचे अधिकारी दिनेश सुखदान यांनी सांगितले की, शिवना गावातील मोकाट कुत्र्यांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. आगामी चार ते पाच दिवसांत वाहनासह पथक गावात दाखल होऊन मोकाट कुत्र्यांना पकडून नेण्यात येणार आहे.

गावात मोकाट कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरिक, शाळकरी विद्यार्थी, महिला तसेच दुचाकीस्वारांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे ग्रामपंचायतीने घेतलेल्या या निर्णयामुळे नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता बातमीची ग्रामपंचायतीने तातडीने दखल घेत कारवाई सुरू केल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

यावेळी पंचायत समिती सदस्य शेख सलीम, माजी सरपंच डॉ. सलमान खान, शिवना ग्रामविकास अधिकारी रवी गंगावणे, माजी ग्रामपंचायत सदस्य रजीक सेठ, हाश्मी सर, पत्रकार शेख मुशर्रफ, सय्यद जमीर, जहीर कुरेशी, ग्रामपंचायत कर्मचारी अमोल, गजु काळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## नवी मुंबईमध्ये साथीच्या आजारांचा कहर, डेंग्यू-मलेरियाचे रुग्ण; आकडेवारी जाहीर

**नवी मुंबई:** नवी मुंबईकरांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची बातमी आहे. नवी मुंबईतील तळोजा परिसरामध्ये डेंग्यु आणि मलेरियाच्या रूग्णांची झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये शहर आणि ग्रामीण परिसरामध्ये साथीचे आजार डोकं वर काढताना पाहायला मिळते. अस्वच्छता, न वाहतं पाणी यांसह अनेक वेगवेगळ्या कारणांमुळे साथीचे आजार नागरिकांना होताना दिसतात. नवी मुंबईतील तळोजाच्या शहरी आणि ग्रामीण परिसरामध्ये दुर्गंधीमुळे अनेक नागरिकांना डेंग्यु आणि मलेरियाची लागण झालेले पाहायला मिळत आहे.

गेल्या काही महिन्यांपासून, तळोजा शहर आणि लगतच्या ग्रामीण भागात डेंग्यू आणि मलेरियाच्या रुग्णांमध्ये वाढ होताना पाहायला मिळत आहे. त्यामुळे वेगाने विकसित होणाऱ्या या परिसरामध्ये डासांमुळे होणाऱ्या आजारांविषयी नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, जून ते ऑगस्ट दरम्यान डेंग्यू आणि मलेरियाचे 20 रुग्ण आढळून आले आहेत. तीन महिन्यांच्या कालावधीत तपासलेल्या 183 डेंग्यू संशयित रुग्णांपैकी आठ जणांना संसर्ग झाल्याचे निष्पन्न झाले. त्याचप्रमाणे, 4103 रहिवाशांची मलेरिया चाचणी करण्यात आली, त्यापैकी 12 जणांना मलेरियाची लागण झाल्याचे आढळून आले, अशी माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाने दिली.

नवी मुंबईतील तळोजामध्ये झपाट्याने विकासकामे होताना पाहायला मिळत आहे. मोठ्या प्रमाणावर नागरिक या परिसरामध्ये स्थलांतरित होताना दिसत आहेत.

# जिंतूर तालुक्यातील मोहखेड्यात चक्क गांजाची लागवड

## 1.21 कोटीच्या गांजाची शेती बहरू लागली, अंमली पदार्थ विरोधी पथकाची दबंग कार्यवाही

**जिंतूर::** जिंतूर तालुक्यातील मोहखेड तांडा परिसरात शेतात गांजाची लागवड केल्याचे आढळून आल्याने अंमली पदार्थ विरोधी पथकाने छापा टाकून तब्बल १०९ गांजाची झाडे जप्त केली.

या झाडांचे एकूण वजन २४२ किलो ३०० ग्रॅम असून, त्यांची किंमत १ कोटी २९ लाख १५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी परमेश्वर रामा चांदणे (वय ३२, रा. मोहखेड तांडा, ता. जिंतूर) याच्याविरुद्ध जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहखेड (ता. जिंतूर) येथील शेतकरी कैलास सखाराम राठोड यांच्या गट क्रमांक १६ मधील शेतजमीन परमेश्वर चांदणे यांने ठोक्याने घेतली होती. त्याच्या ताब्यातील या शेतात गांजाच्या झाडांची लागवड करून त्यांची जोपासना करण्यात आल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती.

गुप्त माहितीनंतर पथकाने संबंधित शेतात छापा टाकून पाहणी केली असता गांजाची झाडे आढळून आली. कारवाईदरम्यान एकूण १०९ झाडे जप्त करण्यात आली. या झाडांचे वजन २४२ किलो ३०० ग्रॅम असून, जप्त मुद्देमालाची किंमत १ कोटी २९ लाख १५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात. गुन्हा रजिस्टर क्रमांक ५६४



/ २०२६ नुसार एनडीपीएस कायद्यातील कलम ४ (ब), २० (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

मोहखेड तांडयातील शेतात गांजाची लागवड केलेल्या प्रकरणी अंमली पदार्थ विरोधी पथकाने जप्त केलेला मुद्देमाल व किंमत गांजाची झाडे 109 एकूण वजन 242 किलो 300 ग्रॅम मुद्देमालाची किंमत 1,21,15,000 रुपये (1 कोटी 21 लाख 15 हजार) असा होता तपास शेतकरी कैलास राठोड यांच्या गट.नं.९६ मधील शेतजमीन परमेश्वर चांदणे यांने ठोक्याने घेतली होती..त्या शेतात गांजाची लागवड करून जोपासना केल्याची माहिती मिळाली.

माहितीच्या आधारे पथकाने छापा टाकून 109 झाडे जप्त केली.

अंमली पदार्थ विरोधी पथकाची धडक कारवाई मादक पदार्थांच्या विळख्यातून समाजाला वाचवण्यासाठी पोलीसांची मोहीम सुरूच राहणार - पोलीस प्रशासन

या दबंग कारवाईत सहभागी अधिकारी व कर्मचारी अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या विशेष पोलीस महानिरीक्षक ज्योतप्रिया सिंग, पोलीस अधीक्षक अजित टिके, पोलीस अधीक्षक अनुज तारे आणि पोलीस उपअधीक्षक अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक दिगंबर कोपरे, पोलीस उपनिरीक्षक नितीन पवार, ए, पो.उ.नि.संतोष वावळ, हनुमंत जकवेवाड, पिराजी निळे,प्रशांत कोकंडे, काशिनाथ कुंडगीर, रोहित मगर, विकास तायडे, शंकर कोस्वेवाड, गणेश जाधव,महेंद्र दासरवार, तानाजी येळगे आणि शेख मुजीब यांचा सहभाग होता. "अंमली पदार्थाचा नायनाट करणे हेच आमचे ध्येय असल्याचा मानस." पथकातील पोलीस प्रशासनाणे व्यक्त केला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## भारतीय फलंदाजीचे ऐतिहासिक वादळ आणि विक्रमी विजय

एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात चारशेहून अधिक धावांचे विशाल लक्ष्य गाठणे ही अशक्यप्राय मानली जाणारी गोष्ट भारतीय संघाने अत्यंत लीलया करून दाखवली आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात भारताने मिळवलेला विजय हा केवळ एका मालिकेतील विजय नसून, तो भारतीय क्रिकेटच्या अफाट क्षमतेचा आणि बदललेल्या आक्रमक मानसिकतेचा दाखला आहे. पाचशेच्या आत चारशेपेक्षा जास्त धावांचे आव्हान समोर असताना कोणत्याही संघाचे मनोबल खचू शकते. मात्र, कर्णधार शुभमन गिल आणि अनुभवी रोहित शर्मा यांनी ज्या धैर्याने आणि झंझावाती शैलीत धावांचा पाठलाग केला, त्याने जागतिक क्रिकेटमध्ये भारतीय फलंदाजीचा नवा दबदबा निर्माण केला आहे. या ऐतिहासिक विजयाचे मुख्य सूत्रधार ठरले ते सलामीवीर शुभमन गिल आणि रोहित शर्मा. पहिल्या विकेटसाठी अवघ्या १५८ चेंडूंत २५५ धावांची विक्रमी भागीदारी रचून या दोघांनी प्रतिस्पर्धी संघाच्या गोलंदाजांचा आत्मविश्वास पूर्णपणे धुळीस मिळवला. विशेषतः कर्णधाराला साजेशी दीडशतकी आणि नंतर द्विशतकी खेळी साकारणाऱ्या शुभमन गिलचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. दबावाच्या क्षणी संघाचे नेतृत्व करताना अत्यंत शांतपणे आणि त्याच वेळी चौफेर फटकेबाजी करत त्याने संघाला विजयाच्या उंबरठ्यावर नेऊन पोहोचवले. रोहित शर्माच्या शतकाने आणि विराट कोहलीच्या साथीने या आव्हानाला अगदी सोपे रूप दिले, ज्यामुळे इतके मोठे लक्ष्य भारताने अवघ्या ४४ षटकांच्या आत सहज पूर्ण केले. एकाच सामन्यात दोन्ही बाजूंचे मिळून तब्बल पाच फलंदाज शतके ठोकतात आणि चारशेहून अधिक धावांचा पाठलाग यशस्वी होतो, ही घटना क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी लिहिली जाईल. यापूर्वी भारताने तीनशे साठ धावांचा पाठलाग यशस्वी केला होता, मात्र आता चारशेचा टप्पा ओलांडून भारताने एक नवा कीर्तिमान प्रस्थापित केला आहे. तीन सामन्यांच्या मालिकेत विजयी आघाडी घेतानाच भारतीय संघाने आगामी सर्व मोठ्या स्पर्धांसाठी आपल्या आक्रमक आणि निर्भय क्रिकेटची स्पष्ट झलक दाखवून दिली आहे. हा विजय भारतीय क्रिकेटच्या नव्या सुवर्णयुगाची नांदी ठरला आहे.

## वीज चोरी करणाऱ्या तिघांवर गुन्हे दाखल, महावितरण पथकाची अचानक धडक मोहीम

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील कामरगाव येथे महावितरणच्या पथकाने केलेल्या अचानक तपासणीदरम्यान परस्पर आकडा टाकून घरगुती वीज चोरी करत असल्याचे निदर्शनास आले.वीज चोरी करणाऱ्या तिघा जणांविरोधात भारतीय विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३५ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी महावितरणचे वैभव दिलीप निकम (वय ३३, रा. नवोदय कॉलनी, भूषणनगर, केडगाव, अहिल्यानगर) यांनी दोन स्वतंत्र फिर्यादी दिल्या आहेत. कामरगाव येथील पोपट काशिनाथ शेळके याच्या घरी वीज जोडणीची पाहणी केली असता, त्या ठिकाणी महावितरणची कोणतीही अधिकृत वीज जोडणी व मीटर अस्तित्वात नसताना तो बाजुच्या लघु दाब वाहिनीवरून आकडा टाकून वीज चोरी करत असल्याचे समोर आले.

# दुष्काळात तातडीचा आधार, भविष्यासाठी चारा सुरक्षा; राज्यात प्रथमच वैरण विकास धोरण

राज्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांसाठी वैरण विकास कार्यक्रम हा केवळ चारा उपलब्धतेचा प्रश्न सोडविणारा उपक्रम न ठरता पशुपालन अर्थव्यवस्थेला स्थैर्य देणारे महत्वाचे पाऊल ठरणार आहे. स्थानिक पातळीवर वर्षभर पुरेसा आणि पौष्टिक चारा उपलब्ध करण्यावर भर दिल्यास पशुपालकांचे बाहेरील चाऱ्यावरचे अवलंबित्व कमी होऊ शकते. शासकीय पडीक, गायरान तसेच उपलब्ध जमिनींचा नियोजनबद्ध वापर करून चारा उत्पादन वाढविणे, सुधारित चारा वाणांना प्रोत्साहन देणे आणि वैरणीच्या झाडांची लागवड वाढविणे यामुळे पशुधनासाठी सातत्यपूर्ण खाद्यसुरक्षा निर्माण होण्यास मदत होईल. त्यातून पशुधनाचे आरोग्य व उत्पादकता टिकून राहण्याबरोबरच दुग्ध व्यवसायाचा खर्च नियंत्रित करण्यास हातभार लागू शकतो. विशेषतः दुष्काळ आणि पावसाच्या अनिश्चिततेच्या काळात चारा टंचाईवर तात्पुरती उपाययोजना करण्याऐवजी दीर्घकालीन व्यवस्था उभारणे, हे या कार्यक्रमाचे सर्वाधिक महत्वाचे वैशिष्ट्य ठरते.

पशुपालन व्यवसायासाठी चारा ही जीवनरेखा आहे. राज्यातील हिरव्या व सुक्या चाऱ्यातील तूट भरून काढण्यासाठी राज्य सरकारने प्रथमच 'वैरण विकास धोरण' लागू करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. दुष्काळी भागात तातडीने चारा उपलब्ध करून देण्याबरोबरच राज्यासाठी दीर्घकालीन चारा सुरक्षा निर्माण करण्याच्या दुहेरी उद्देशाने हे धोरण जाहीर केले आहे. राज्यातील सुमारे २ कोटी ७८ लाख पशुधनासाठी हिरवा आणि सुका चारा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी चारा लागवडीचे क्षेत्र वाढविणे, उपलब्ध चाऱ्याची गुणवत्ता सुधारणे, त्याची योग्य पद्धतीने साठवणूक करणे आणि पर्यायी चारा संसाधनांना चालना देणे, अशा व्यापक उपाययोजनांचा धोरणात समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी ४९६ कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीचे नियोजन असून, वार्षिक १२ हजार लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

२०२६ च्या खरीप हंगामात 'ट्रिगर-१' लागू झालेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीवरील उपाययोजनांसाठी २५ सप्टेंबर २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनेचाही समावेश आहे.

*चारा तूट कमी करण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना*

राज्यातील पशुधन संख्या, उपलब्ध चारा आणि चाऱ्याची तूट विचारात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी २० नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय कृती दल स्थापन करण्यात आले होते. या कृती दलाने चारा टंचाई दूर करण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांची शिफारस केली आहे.

राज्यात सुमारे २ कोटी ७८ लाख पशुधन आहे. या पशुधनासाठी १ हजार १७६.७८ लाख मेट्रिक टन हिरव्या चाऱ्याची गरज असताना ९०७.४९ लाख मेट्रिक टन चारा उपलब्ध आहे. हिरव्या चाऱ्याची तूट २६८.३७ लाख मेट्रिक टन म्हणजेच २२.७९ टक्के आहे. सुक्या चाऱ्याची गरज ३७७.८७ लाख मेट्रिक टन असून, प्रत्यक्ष उपलब्धता २९६.६२ लाख मेट्रिक टन आहे. त्यामुळे सुक्या चाऱ्याची तूट ८१.०६ लाख मेट्रिक टन म्हणजे २१.४३ टक्के आहे. पशुपालन व्यवसायासाठी चारा हा अत्यावश्यक घटक असल्याने ही तूट भरून काढण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपायांची आवश्यकता आहे.

*पडीक व गायरान जमिनीवर चारा लागवड*

चारा लागवडीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी महसूल आणि वन विभागाच्या शासकीय पडीक, गायरान किंवा मुलकी पड जमिनींचा वापर करण्याचा विचार आहे. कुरण आणि गायरान जमिनींमध्ये सुधारित गवत तसेच द्विदल चारा पिकांच्या जातींची लागवड केली जाणार आहे. 'हॉर्टी-पाश्चर' पद्धतीत फळबागांमधील दोन झाडांच्या मोकळ्या जागेत चारा वाणांची लागवड करून दुहेरी उत्पादन घेण्यात येणार आहे. 'सिल्वी-पाश्चर' पद्धतीत पडीक, खडकाळ किंवा डोंगराळ जमिनीवर सुबाभूळ, अंजन आणि शेवगा यांसारख्या चारा देणाऱ्या झाडांसोबत बहुवार्षिक गवताची लागवड केली जाईल.

शेतातील बांध, बंधारे, तलावांचे बांध, परसबाग, जलमार्ग तसेच नापीक आणि मशागतीस अयोग्य जमिनींचाही चारा उत्पादनासाठी उपयोग केला जाणार आहे. अशा जागांवर गिनी गवत, सिग्नल गवत आणि स्टायलो गवताची लागवड करण्याचा प्रस्ताव आहे.

*चाऱ्याची पौष्टिकता वाढविण्यावर भर*

उपलब्ध चाऱ्याचे केवळ प्रमाण वाढविण्याबरोबरच त्याची गुणवत्ता आणि पौष्टिक मूल्य सुधारणे हा धोरणाचा महत्वाचा भाग आहे. त्यासाठी मुरघास निर्मिती, चाऱ्यावर युरिया प्रक्रिया, कापूस पिकाच्या टाकाऊ अवशेषांवर ओझोन प्रक्रिया आणि एन्झाइम अर्थात विकर प्रक्रिया अशा तंत्रांचा वापर केला जाणार आहे. कृषी अवशेष आणि कृषी प्रक्रिया उद्योगांमधील उपपदार्थांचा योग्य वापर करून त्यांचे पौष्टिक खाद्यगट्टे व मुरघासामध्ये रूपांतर करण्यात येईल. यामुळे अन्यथा वाया जाणाऱ्या कृषी अवशेषांचा पशुखाद्यासाठी उपयोग होऊन चारा सुरक्षेला बळकटी मिळणार आहे.

*शास्त्रीय साठवणुकीतून टंचाईग्रस्त भागांना पुरवठा*

वैरण विकास धोरणानुसार, उपलब्ध चारा अधिक काळ टिकवून ठेवण्यासाठी शास्त्रीय साठवणुकीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यासाठी 'हे बेल्स', 'फीड ब्लॉक', 'लीफ मिल' आणि कडबाकुट्टी या पद्धतींचा अवलंब केला जाईल. चाऱ्याची टिकाऊक्षमता वाढल्याने अतिरिक्त उत्पादनाच्या काळात त्याची साठवणूक करून टंचाईच्या काळात गरजू भागांना पुरवठा करणे शक्य होणार आहे.

चारा कापणी, प्रक्रिया, वाहतूक आणि जनावरांना चारा देताना होणारा अपव्यय रोखण्यावरही भर दिला जाणार आहे. योग्य प्रक्रिया व साठवणुकीमुळे उपलब्ध चाऱ्याचा अधिक परिणामकारक वापर करता येणार आहे.

पारंपरिक चारा पिकांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी चारा संसाधनांना प्रोत्साहन देण्यात येईल. त्यामध्ये अझोला उत्पादन, हायड्रोपोनिक पद्धतीने चारा निर्मिती आणि काटेविरहित निवडुंगाचा चारा म्हणून वापर यांचा समावेश आहे. कमी जमीन आणि मर्यादित पाण्यामध्ये चारा उपलब्ध करून देण्यासाठी या पर्यायांचा उपयोग होणार आहे.

वैरण ग्राहक सेवा केंद्रांची निर्मिती, सार्वजनिक-खासगी भागीदारीतून चारा विकास, चारा विकास विस्तार उपक्रम आणि संस्थात्मक बियाणे साखळी उभारणे या पूरक उपाययोजनांचाही धोरणात विचार करण्यात आला आहे. सार्वजनिक आणि खासगी क्षेत्राच्या सहकार्याने चारा उत्पादन, प्रक्रिया व उपलब्धतेची व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

*दुष्काळी भागांसाठी तातडीचा लाभ*

सद्यस्थितीत जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी कमी पाण्यात चारा उत्पादन घेण्यावर अल्पकालीन भर दिला जाणार आहे. उपलब्ध चाऱ्याची टिकाऊक्षमता वाढवून त्याची योग्य साठवणूक केल्यास पुढील काळात टंचाईग्रस्त भागांना पुरवठा करणे सुलभ होईल.

दीर्घकालीन उपायांमधून पशुपालनासाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध करणे, पशुजन्य उत्पादनांमध्ये स्वयंपूर्णता साधणे आणि पशुपालन व्यवसायाला उद्योजकतेचे स्वरूप देण्याचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेतून सुमारे २५ लाख लाभार्थ्यांना लाभ अपेक्षित असून, त्यापैकी वैरण विकास कार्यक्रमातून वार्षिक १२ हजार रोजगार निर्माण करण्याचे नियोजन आहे. पशुपालकांचे उत्पन्न वाढल्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

*'विकसित महाराष्ट्र २०४७' शी थेट जोड*

'विकसित महाराष्ट्र २०४७' कार्यक्रमामध्ये पीक अवशेष आणि कृषी प्रक्रिया उद्योगांतील उपपदार्थांचा वापर पौष्टिक खाद्यगट्टे व मुरघास निर्मितीसाठी करून चारा सुरक्षा मजबूत करण्याच्या उपाययोजनेचा समावेश आहे. त्याद्वारे दुग्धव्यवसाय आणि पशुपालन या शेतीपूरक व्यवसायांना उद्योजकतेचे स्वरूप देण्याचा उद्देश निश्चित करण्यात आला आहे. राज्यात पशुपालन व्यवसायामध्ये उद्योजकता निर्माण करण्याच्या व्यापक धोरणातून वार्षिक सुमारे २५ लाख लाभार्थ्यांना लाभ देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी अंदाजे ४ हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद प्रस्तावित आहे. यातील वैरण विकासाशी संबंधित कार्यक्रमासाठी १२ हजार लाभार्थी आणि ४९६ कोटी रुपयांच्या तरतुदीचे नियोजन करण्यात आले आहे.

वैरण विकास धोरणाचा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे चारा टंचाईकडे केवळ आपत्कालीन मदत म्हणून न पाहता चारा उत्पादन, जमीन वापर, गुणवत्तापूर्ण वाण आणि साठवणूक यांचे दीर्घकालीन नियोजन करण्याकडे शासनाचा कल आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र वैरण विकास धोरण जाहीर करण्यात आले असून या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्यातील पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याची उपलब्धता अधिक सक्षमपणे उपलब्ध होईल. तसेच पशुपालन आणि दुग्धव्यवसाय या शेतीपूरक व्यवसायांना भक्कम बळ मिळणार असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवी दिशा मिळेल.

**-मा. नां.पंकजा मुंडे,**
**पशुसंवर्धनमंत्री**






दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## कु. वैशाली पांडुरंग आवचारची बुद्धिबळ व कॅरमच्या विभागीय स्पर्धेसाठी निवड




हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू येथील इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कु. वैशाली पांडुरंग आवचार हिने बुद्धिबळ व कॅरम या दोन्ही क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी करत विभागीय स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजी कल्याण मंडपम, परभणी येथे आयोजित आंतरशालेय जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत वैशालीने १७ वर्षांखालील मुलींच्या गटात ग्रामीण विभागातून प्रथम क्रमांक पटकावत अजिंक्यपद मिळविले. त्यानंतर दिनांक २६ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, परभणी येथे आयोजित कॅरम स्पर्धेतही तिने १९ वर्षांखालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक मिळवत अजिंक्यपद पटकावले.

या उल्लेखनीय कामगिरीमुळे वैशालीची बुद्धिबळ (चेस) व कॅरम या दोन्ही खेळांच्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विशेष म्हणजे, उपलब्ध माहितीनुसार बुद्धिबळ व कॅरम या दोन्ही क्रीडा प्रकारांत विभागीय स्तरासाठी निवड झालेली जिल्ह्यातील ती एकमेव विद्यार्थिनी ठरली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धांमध्ये जिल्ह्यातील विविध शाळांमधील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. वैशालीने दोन्ही स्पर्धांमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात करून विजेतेपद मिळविले. वैशालीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल प्रिन्स सीबीएसई इंग्लिश स्कूलचे प्राचार्य सुबोध हिवराळे, क्रीडा शिक्षक श्री. सूरज शिंदे, आजी-आजोबा सौ. मुक्ताबाई वैजनाथराव आवचार तसेच आई-वडील सौ. शुभांगी व श्री. पांडुरंग आवचार यांनी तिचे अभिनंदन करून सत्कार केला. विभागीय स्तरावरही बुद्धिबळ आणि कॅरम या दोन्ही खेळांत उत्कृष्ट कामगिरी करून विजयाची परंपरा कायम ठेवावी, यासाठी वैशालीला मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

## शाळकरी मुलांनी भांडणात काढला कोयता, वाडियापार्कजवळ घडली घटना, मुले ताब्यात

### राष्ट्रवादीचे निलेश बांगरे यांच्यामुळे मोठी घटना टळली

अहिल्यानगर : वाडियापार्क येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर परिसरातील एका शाळेतील इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांमध्ये किरकोळ वादातून थेट कोयताच मारामाऱ्यासाठी काढल्याची घटना काल दि.३० रोजी दुपारी अडीचच्या सुमारास घडली या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. भर दुपारी झालेल्या शाळकरी मुलांच्या या मारामाऱ्यामुळे वाडियापार्क चौकात बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.दरम्यान, या घटनेच्या वेळी त्याठिकाणी कामासाठी आलेले राष्ट्रवादी चे निलेश बांगरे यांच्या लक्षात ही गोष्ट येताच त्यांनी कोतवाली पोलिसांना फोन केला. कोणताही विलंब न करता पोलीस घटनास्थळी आले त्यामुळे मोठी घटना टळली.

वाडियापार्क चौकात तिन वेगवेगळया नामांकित शाळा आहेत. मात्र त्यापकी एका नामवंत शाळेतील इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांमध्ये वाद झाले. सदरचे वादानंतर मुलांच्या एका गटाने एका मुलाला वाडियापार्क जवळ गाठून त्याला मारहाण केली. त्यापैकी एकाने मारामाऱ्यासाठी शाळेतील दप्तारामध्ये ठेवलेला कोयताच बाहेर काढला. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.

पोलिसांनी 14पैकी आठ जणांना ताब्यात घेतले आहे.सर्व जण अल्पवयीन आहेत. त्यांची कसुन चौकशी सुरु आहे. या घटनेत वापरलेला कोयता आणि २ दुचाक्या पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहेत. कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# ‘मुख्यमंत्री आरोग्य संवाद’ उपक्रमातून वैद्यकीय तज्ज्ञ साधणार तरुणाईशी थेट संवाद

**मुंबई :** बदलत्या जीवनशैलीमुळे तरुणांमध्ये वाढणारा स्क्रीन टाइम, अपुरी झोप, चुकीच्या आहाराच्या सवयी आणि मानसिक ताण यांसारख्या समस्या गंभीर बनत चालल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आजार टाळण्यासाठी तरुण वयापासूनच आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जागृती निर्माण करण्यासाठी, यंदाच्या नवरात्रोत्सवात राज्यात प्रथमच ‘मुख्यमंत्री आरोग्य संवाद’ हा विशेष 9 दिवसांचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमांतर्गत राज्यातील विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक व वैद्यकीय तज्ज्ञ राज्यभरातील विद्यार्थ्यांशी थेट आरोग्यविषयक संवाद साधणार आहेत.

विद्यार्थ्यांशी थेट संवाद आणि सहभाग

राज्यातील वैद्यकीय, कृषी, अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य, कला आणि इतर सर्व विद्याशाखांतील विद्यार्थी या उपक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभागी होणार आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, विभागप्रमुख आणि नामवंत वैद्यकीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. तरुण वयात आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यास त्याचे दूरगामी दुष्परिणाम पुढील आयुष्यात जाणवू शकतात. त्यामुळे आजार झाल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा आजारच होऊ नयेत यासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, मानसिक आरोग्याची काळजी, व्यसनांपासून दूर राहणे आणि वेळेवर आरोग्य तपासणी करण्याचे महत्त्व या संवादातून पटवून दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः आरोग्याबाबत जागृत राहावे आणि ही महत्त्वाची माहिती आपल्या कुटुंब, मित्रपरिवारापर्यंत पोहोचवावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

संवादाचे प्रमुख विषय

**या विशेष उपक्रमादरम्यान खालील महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा आणि मार्गदर्शन केले जाणार आहे:**

बदलती जीवनशैली आणि तरुणांचे आरोग्य, संतुलित आहार आणि बदललेल्या आहाराच्या सवयी, व्यायाम आणि शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक आरोग्य, मोबाईल, सोशल मीडिया आणि वाढता स्क्रीन टाइम, व्यसनांपासून दूर राहणे, निरोगी जीवनशैली आणि आरोग्यदायी समाजनिर्मिती.

**तज्ज्ञांचे मत :** ‘मुख्यमंत्री आरोग्य संवाद’ हा राज्यातील तरुणाईशी थेट संवाद साधणारा एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले. सध्याच्या बदलत्या जीवनशैलीत तरुणांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांवर त्यांच्याशी थेट संवाद साधणे ही काळाची गरज बनली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आरोग्याशी संबंधित प्रश्न मोकळेपणाने मांडता येणार असून, तज्ज्ञांकडून मिळणारी माहिती त्यांना आयुष्यभर निरोगी राहण्यासाठी अत्यंत उपयोगी ठरणार आहे.

## सेवा संकल्प अभियान अंतर्गत स्वच्छतेपासून ‘विकसित भारत’पर्यंत विविध उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,:** जिल्ह्यात सुरू असलेल्या ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत ग्रामपंचायत व शाळास्तरावर स्वच्छता मोहीम, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, मानवी साखळी तसेच स्वच्छतादूतांचा सन्मान अशा विविध उपक्रमांचे आज बुधवार दिनांक.30 सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि विकसित भारताच्या संकल्पनेपर्यंत विविध विषयांवर जनजागृती करण्यात येत असून, त्याला नागरिक, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या उपक्रमामध्ये पालम तालुक्यातील धनेवाडी व आनंदवाडी येथे ग्रामपंचायतीच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच ग्रामपंचायत गोपा येथे ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. वक्तृत्व स्पर्धेत विविध गटांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या स्पर्धांमध्ये ९ ते १० या वयोगटामध्ये नंदिनी चव्हाण, पूनम सूर्यवंशी व समृद्धी भालेराव, ६ ते ८ या वयोगटामध्ये तनुजा नारायण रेंगे, आदित्य साहेब धाबळे व आकांक्षा दत्तराव रेंगे, तर ५ वर्षे वयोगटामध्ये संघामित्रा सिद्धार्थ धाबळे व संस्कृती लक्ष्मण रेंगे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

कौडगाव येथील जिल्हा परिषद प्रशाला, जांब केंद्र ब्राह्मणगाव येथे शाळेच्या मागील परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. ग्रामपंचायत वालूर येथे नाली व सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतागृहांची सफाई मित्रांच्या माध्यमातून स्वच्छता करण्यात आली. तसेच ग्रामपंचायत करवली (ता. जिंतूर), शिवाजीनगर-बाभळगाव (ता. पाथरी), देवेगाव (ता. पाथरी) आणि पारवा (ता. पालम) येथेही सेवा संकल्प अभियानांतर्गत स्वच्छता उपक्रम राबविण्यात आले.

ग्रामपंचायत वाई येथे स्वच्छतादूत अविनाश दौंड यांचा सफाई मित्र कार्यक्रमात पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

शाळेतील स्वच्छता उपक्रमात सहकार्य करणारा इयत्ता पाचवीतील विद्यार्थी स्वराज अविनाश दौंड याचाही पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी अविनाश दौंड, ग्रामपंचायत अधिकारी प्रवीण वाव्हळे, शिक्षकवृंद आणि स्वच्छ भारत मिशन ग्रामीणचे समन्वयक डी. आर. कामीटे आदी उपस्थित होते.

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, पाथरी येथे आज बुधवार, दि. ३० सप्टेंबर रोजी ‘विकसित भारत-२०४७’ या उपक्रमांतर्गत चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. वक्तृत्व स्पर्धेत इयत्ता ६ वी ते ८ वी गटात अंकिता मुंगे हिने प्रथम, शुभांगी बिक्कड हिने द्वितीय तर संस्कृती तोंडे हिने तृतीय क्रमांक मिळविला. इयत्ता ९ वी व १० वी गटात शिवकन्या डोंगरे हिने प्रथम तर भक्ती बिक्कड हिने द्वितीय क्रमांक मिळविला.

दरम्यान, कै. मातोश्री धोंड्याबाई प्राथमिक शाळा, लोणी येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत विद्यार्थ्यांच्या सहभागातून मानवी साखळीच्या माध्यमातून स्वच्छता व जनजागृतीचा संदेश देण्यात आला. जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायती व शैक्षणिक संस्थांमध्ये राबविण्यात आलेल्या या उपक्रमांमुळे ‘स्वच्छ गाव-सुंदर गाव’ संकल्पनेला बळ मिळत असून, स्वच्छतेच्या कार्यात विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ, सफाई मित्र आणि स्थानिक प्रशासनाचा सक्रिय सहभाग दिसून येत आहे. स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या समन्वयातून हे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## फर्दापूर परिसरातील बँकांच्या सक्तीच्या वसुलीला ब्रेक प्रशासनाचे कडक आदेश

### रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करण्याची मागणी

**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर यंदाच्या पावसाळ्याने पाठ फिरवल्यामुळे फर्दापूर आणि परिसरातील गावांमध्ये दुष्काळाच्या तीव्र झळा बसू लागल्या आहेत पावसाअभावी खरीप पिके करपून गेल्याने स्थानिक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे मात्र राज्य शासनाने नुकत्याच घेतलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयामुळे फर्दापूरच्या बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे दुष्काळी परिस्थितीत कोणत्याही बँकेने कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांच्या दारात जाऊ नये असे सक्त आदेश देण्यात आले आहेत या शासकीय निर्णयाच्या पार्श्वभूमीवर फर्दापूरकरांसाठी खालील महत्त्वाचे मुद्दे समोर आले आहेत

फर्दापूर परिसरातील अनेक शेतकरी पीक कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहेत नापिकीमुळे कर्ज कसे फेडावे या चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना बँका आणि पतसंस्थांच्या अधिकाऱ्यांनी वसुलीसाठी त्रास देऊ नये अशा कडक सूचना शासनाने दिल्या आहेत त्यामुळे शेतकऱ्यांवरील मानसिक ताण काहीसा हलका होणार आहे

फर्दापूर परिसरात पाणीटंचाई गंभीर स्वरूप धारण करत आहे शासनाच्या नव्या धोरणानुसार आता परिसरातील गावतलाव आणि पाझर तलाव केवळ पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवले जाणार आहेत माणसांच्या पिण्याच्या पाण्यासोबतच जनावरांच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्न सोडवण्याला प्रशासनाने प्रथम प्राधान्य द्यावे अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे दुष्काळाचा फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसू नये म्हणून शासनाने दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क न घेता त्यांचे आवेदनपत्र भरून घेण्याचे निर्देश दिले आहेत याचा थेट फायदा फर्दापूर आणि पंचक्रोशीतील शेकडो गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना होणार असून दुष्काळग्रस्त पालकांवरील आर्थिक बोजा कमी होणार आहे शेतात कामे उरली नसल्याने फर्दापूर परिसरातील शेतमजुरांच्या हाताला काम नाही शासनाने दुष्काळावर मात करण्यासाठी रोजगार हमी योजनेतून मनरेगा हजारो कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे या माध्यमातून फर्दापूर ग्रामपंचायत आणि महसूल विभागाने तातडीने जलसंधारण विहिरी आणि बांधकामाची कामे सुरू करावीत जेणेकरून मजुरांचे स्थलांतर थांबेल आणि त्यांना गावातच रोजगार मिळेल शासनाने दुष्काळी यादीत आणखी काही तालुक्यांचा समावेश करून दिलासादायक निर्णय घेतले आहेत आता फर्दापूर महसूल विभागाने या सर्व उपाययोजनांची गावात प्रभावी अंमलबजावणी करावी अशी आग्रही मागणी स्थानिक शेतकरी आणि नागरिकांकडून केली जात आहे

## आढावा बैठकीत गर्दीचा फायदा घेऊन रक्कम पळविणाऱ्या भामट्याला पकडले

**राहुरी :**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या राहुरी येथील आढावा बैठकीत गर्दीचा फायदा घेऊन एका भामट्याने उत्तम वाघ यांच्या खिशातील रोख रक्कम काढून घेतली. तेव्हा भामट्याला रंगेहात पकडुन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाणी टंचाई आढावा बैठकीचे दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी राहुरी शहरातील पांडुरंग मंगल कार्यालय येथे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीसाठी उत्तम वाघ हे त्यांच्या काही मित्रां सोबत आले होते. सायंकाळी ६.१५ वाजे दरम्यान बैठक संपल्यानंतर उत्तम वाघ हे कार्यालयातून बाहेर जात होते. त्यावेळी एका भामट्याने गर्दीचा फायदा घेऊन उत्तम वाघ यांच्या पॅन्टच्या खिशातील १९ हजार रुपए रोख रक्कम हाथ चलाखी करुन काढून घेतली.

## परभणी येथील शासकीय रुग्णालयातून युवक बेपत्ता

### नानलपेठ पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन



हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,:** परभणी येथील शासकीय रुग्णालयात उपचार घेत असलेला 30 वर्षीय युवक शुक्रवार (दि. 25) रोजी सकाळी पावणेअकरा वाजता रुग्णालयातील वार्ड क्रमांक 8 मधून बेपत्ता झाला आहे. बेपत्ता युवकाबाबत काही माहिती मिळाल्यास अथवा तो आढळून आल्यास नानलपेठ पोलीस, परभणी येथे तात्काळ माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

राजू जयराम हिवाळे असे बेपत्ता युवकाचे नाव त्याला बुधवार, दि. 23 सप्टेंबर रोजी झटका आल्याने कुटुंबीयांनी शासकीय रुग्णालय, परभणी येथे उपचारासाठी दाखल केले होते. शुक्रवार, दि. 25 सप्टेंबर रोजी त्याचे वडील जयराम हिवाळे हे त्याच्यासोबत रुग्णालयात होते. डॉक्टरांसोबत औषधे घेण्यासाठी ते काही वेळ वार्डबाहेर गेले होते. ते औषधे घेऊन परतल्यानंतर राजू वार्डमध्ये दिसून आला नाही. त्यानंतर कुटुंबीयांनी रुग्णालयाच्या परिसरात तसेच अन्य ठिकाणी शोध घेतला; मात्र तो आढळून आला नाही.

बेपत्ता युवकाचा रंग सावळा, उंची सुमारे ५ फूट ५ इंच, सडपातळ बांधा, लांबट चेहरा, चेहऱ्यावर दाढी, सरळ नाक असून, बेपत्ता होताना त्याने पांढरा शर्ट व निळी पॅन्ट परिधान केली होती. डाव्या हातावर जखमांच्या खुणा असून उजव्या हातावर ‘चंदा’ असे नाव गोंदलेले आहे. तो कोणालाही आढळून आल्यास नानलपेठ पोलीस ठाणे (०२४५२-२२०४५०), पोलीस निरीक्षक गोबाडे (८८०५९५७४००)] पोलीस हेडकॉन्स्टेबल एस. एस. मुरकुटे (८७६६८८१६८२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## हेरिटेज वॉकमध्ये विद्यार्थ्यांनी जाणला बीबी का मकबऱ्याचा इतिहास

### जागतिक पर्यटन दिनानिमित्त 60 हून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पुस्तकातील इतिहास प्रत्यक्ष वास्तूतून अनुभवण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळावी, या उद्देशाने जागतिक पर्यटन दिनानिमित्त ‘टीम शहरनामा’तर्फे मंगळवारी बीबी का मकबरा येथे विशेष हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले. या वारसा फेरीत ६० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत बीबी का मकबऱ्याचा इतिहास, स्थापत्यकला आणि सांस्कृतिक वारसा जाणून घेतला.

इतिहास व पुरातत्त्व विभाग, एमजीएम विद्यापीठ, आख्यान फाउंडेशन, गरवारे कम्युनिटी सेंटर, अॅडगाइड मीडिया प्रा. लि., केंद्रीय पर्यटन विभाग आणि ‘टीम शहरनामा’ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम घेण्यात आला. बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर प्राथमिक-माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यामध्ये सहभागी झाले.

पुरातत्त्वज्ञ प्रा. आशुतोष पाटील यांनी विद्यार्थ्यांना बीबी का मकबऱ्याचा इतिहास, स्थापत्यरचना आणि त्यामागील सांस्कृतिक संदर्भ समजावून सांगितले. औरंगजेबाची पत्नी दिलरस बानू बेगम, ज्यांना राबिया-उद्-दुर्रानी असेही म्हटले जाते, यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही वास्तू उभारण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. मध्यवर्ती घुमट, चारही बाजूंचे मिनार, प्रवेशद्वार, संगमरवरी जाळी, कमानी आणि वास्तूच्या




नियोजनाची वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवून सांगण्यात आली.

बीबी का मकबऱ्याची ताजमहालाशी तुलना केली जाते; मात्र दोन्ही वास्तूंचा बांधकामाचा कालखंड, वापरलेले साहित्य, स्थापत्य तंत्र आणि प्रमाण यामध्ये फरक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. दगड, घुमट, कमानी, जाळी, जलव्यवस्था आणि परिसराच्या रचनेतून इतिहासाचे अनेक पदर उलगडता येतात, हे विद्यार्थ्यांना उदाहरणांसह समजावून सांगण्यात आले.

विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने विविध प्रश्न विचारत इतिहास आणि स्थापत्यकलेविषयी माहिती जाणून घेतली. इतिहास हा केवळ पुस्तकांपुरता मर्यादित नसून आपल्या आजूबाजूच्या वास्तू आणि सांस्कृतिक वारशातही तो जिवंत असल्याची जाणीव या हेरिटेज वॉकमधून विद्यार्थ्यांना झाली.

यावेळी गरवारे कम्युनिटी सेंटरचे संचालक सुनील सुतवणे, रमाकांत रौतल्ले, भारत पर्यटन विभागाच्या सहायक निदेशक स्नेहल पाटील, अॅडगाइड मीडियाचे ओम परदेशी, भारत पर्यटन विभागाचे अधिकारी ओम बडे, आशिष कुमार सिंग तसेच ज्ञानेश्वर विद्यालयाच्या शिक्षिका मंगल नाईकवाडे, भरत झोडपे व आर. के. साठे उपस्थित होते.

## ‘महाउपलब्धी’ ॲपबाबत निवृत्ती वेतनधारकांसाठी 6 ऑक्टोबरला कार्यशाळा

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:** निवृत्ती वेतनविषयक सेवा अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने दि. 1 जुलै 2026 पासून ‘Maha-UPLABDHI (महाउपलब्धी)’ हे मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून निवृत्ती वेतनधारकांना विविध निवृत्ती वेतनविषयक सेवा अधिक गतिमान पद्धतीने उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे.

या मोबाईल ॲपबाबत निवृत्ती वेतनधारकांमध्ये व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा कोषागार कार्यालयांमध्ये एकाच दिवशी कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार मंगळवार, दि. 6 ऑक्टोबर 2026 रोजी सकाळी 11 वाजता परभणी येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे होणाऱ्या या कार्यशाळेस वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथील प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) हे ऑनलाइन उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी ‘महाउपलब्धी’ मोबाईल ॲपची कार्यपद्धती, त्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या निवृत्ती वेतनविषयक सेवा तसेच ॲपचा वापर याबाबत माहिती देण्यात येणार आहे.

तरी परभणी जिल्ह्यातील सर्व निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांनी या कार्यशाळेस आवर्जून उपस्थित राहून ‘महाउपलब्धी’ मोबाईल ॲपची माहिती घ्यावी, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. दत्ता भांगे यांनी केले आहे.

# गावाच्या आरोग्यासाठी सर्व घटकांचा समन्वय आवश्यक

## ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ अभियानाची जिल्हास्तरीय कार्यशाळा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गावपातळीवरील सर्व घटकांचा सक्रिय सहभाग, विभागीय समन्वय आणि स्थानिक आरोग्य समस्यांचे तत्काळ निरसन आवश्यक आहे. त्यासाठी अभियानांतर्गत उपक्रमांचे प्रभावी दस्तऐवजीकरण करून त्याची ग्रामस्तरावर अंमलबजावणी करावी, असे मार्गदर्शन जिल्हास्तरीय कार्यशाळेत करण्यात आले.

एमजीएम रुग्णालय परिसरातील द्योतन सभागृहात ही कार्यशाळा झाली. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू




पी. एम. व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अभियानाचे नोडल अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे यांच्या नियोजनातून कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

प्रार्थना, राष्ट्रगीत, वंदे मातरम् व राज्यगीताने कार्यशाळेची सुरुवात झाली. साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका लांडगे यांनी प्रास्ताविकातून अभियानाची भूमिका, उद्दिष्टे व अपेक्षित कार्यवाही स्पष्ट केली. जिल्हा माता व बालसंगोपन अधिकाऱ्यांनी शासन निर्णयानुसार अभियानाची उद्दिष्टे, आरोग्य निर्देशक आणि विविध उपक्रमांची माहिती दिली.

सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एस. शैलजा यांनी एप्रिल ते सप्टेंबरदरम्यान राबविलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. नियोजन, अंमलबजावणी, अहवाल सादरीकरण आणि आवश्यक कागदपत्रांच्या जतनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. उपक्रमांची वृत्तपत्रीय कात्रणे, छायाचित्रे, अहवाल आणि इतर IEC साहित्य व्यवस्थित जतन करण्यावर विशेष भर देण्यात आला.

विविध आरोग्य संस्थांतील समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी PPTद्वारे गावपातळीवरील आरोग्य तपासणी, जनजागृती, सेवा वितरण आणि नागरिकांच्या सहभागातून राबविलेल्या उपक्रमांचे सादरीकरण केले. राज्यस्तरावरून उपस्थित स्नेहा गवळी व परमार यांनी समूह कृतीच्या माध्यमातून गावातील आरोग्य समस्या ओळखून त्यावर उपाययोजना करण्याचे प्रात्यक्षिक घेतले.

व्हिडिओ क्लिप, पोस्टर व कार्डशीटच्या माध्यमातून विविध समस्या मांडून त्यांची कारणे आणि संभाव्य उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न भाले, डॉ. रंगनाथ तुपे व त्यांच्या पथकाने पोस्टर सादरीकरण केले.

डॉ. अभय धानोरकर यांनी प्रत्येक घटकाने आपली जबाबदारी ओळखून समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. कार्यशाळेस तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य निरीक्षक, बाल विकास प्रकल्प अधिकारी, विस्तार अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, गटप्रवर्तक, आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. व्यवस्थापनासाठी कृष्णा सुरडकर यांच्यासह गुलाबस सांगळे, आर. एम. शेख, संगीता चव्हाण, नाजमीन शेख, रोहित सोनवणे, उत्तम कुंभार, रामेश्वर मुळे, विश्वनाथ तावडे, सुहास देशपांडे, मनोज देशपांडे, सचिन काशीद व नरेंद्र बावनथडे यांनी सहकार्य केले. डिजिटल सादरीकरणासाठी कैलास भुमरे व लतिफ यांनी तांत्रिक सहकार्य केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ऑगस्टपर्यंतचे थकीत वेतन झाले अदा!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध विभागांत कार्यरत असणाऱ्या कंत्राटी (आउटसोर्सिंग) कर्मचाऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. मागील दोन-तीन महिन्यांपासून रखडलेले या कर्मचाऱ्यांचे ऑगस्ट २०२६ पर्यंतचे संपूर्ण थकीत वेतन अखेर अदा करण्यात आले आहे. मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या विशेष पुढाकारामुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला आहे. मनपाच्या विविध विभागांत सेवा बजावणाऱ्या बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांचे वेतन मागील काही महिन्यांपासून थकीत असल्याची बाब आयुक्त अमोल येडगे यांच्या निदर्शनास आली होती. याची गांभीर्यपूर्वक दखल घेत आयुक्तांनी तातडीने सद्यस्थितीचा आढावा घेतला. तसेच, कर्मचारी पुरवठा करणाऱ्या संबंधित एजन्सीधारकांच्या वेळोवेळी बैठका घेऊन कर्मचाऱ्यांचे वेतन विनाविलंब अदा करण्याचे सक्त निर्देश दिले होते. या पाठपुराव्यामुळे कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात ऑगस्ट २०२६ पर्यंतचे थकीत वेतन जमा झाले आहे.

कर्मचाऱ्यांना भविष्यात वेतनासाठी प्रतीक्षा करावी लागू नये, यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. यापुढे प्रत्येक महिन्याचे वेतन संबंधित कर्मचाऱ्यांना त्याच महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अदा केलेच पाहिजे, अशा स्पष्ट सूचना आयुक्त अमोल येडगे यांनी सर्व एजन्सीधारकांना दिल्या आहेत. वेतन वेळेत मिळाल्यामुळे बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांनी तीव्र समाधान व्यक्त केले आहे. ऐन सणासुदीच्या किंवा गरजेच्या काळात थकीत वेतन मिळाल्याने कर्मचाऱ्यांनी मनपा आयुक्त अमोल येडगे यांचे विशेष आभार मानले आहेत

"मनपाच्या दैनंदिन कामकाजात बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी केलेल्या कष्टाचा मोबदला वेळेत मिळणे ही त्यांची रास्त अपेक्षा आहे. त्यामुळे यापुढे वेतनाची विलंबाची पुनरावृत्ती होणार नाही," असे मत मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी व्यक्त केले.

## राष्ट्रीय सब-ज्युनिअर सॉफ्टबॉल स्पर्धेत ओडिशाचा इतिहास

### मुलांच्या गटात ओडिशाला सुवर्ण; केरळ उपविजेता, महाराष्ट्राला कांस्य — मुलींमध्ये आंध्रप्रदेश विजेता

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर** : शेवटच्या इनिंगपर्यंत रंगलेल्या थरारक लढतीत ओडिशाच्या खेळाडूंनी केरळवर ४-२ अशी मात करत ३९व्या राष्ट्रीय सब-ज्युनिअर सॉफ्टबॉल स्पर्धेच्या मुलांच्या गटात सुवर्णपदक पटकावले. ओडिशाने प्रथमच या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकत इतिहास रचला. मुलांच्या गटात केरळला रौप्य, तर यजमान महाराष्ट्राला कांस्यपदक मिळाले. मुलींच्या गटात आंध्रप्रदेशने केरळचा ४-३ असा पराभव करून सुवर्णपदकावर नाव कोरले. केरळला रौप्य, तर तेलंगणाला कांस्यपदक मिळाले.

भारतीय सॉफ्टबॉल असोसिएशनच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशन आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा घेण्यात आली. मुलांच्या अंतिम सामन्यात शेवटच्या क्षणापर्यंत विजेता कोण ठरणार, याची उत्सुकता कायम होती. अखेर निर्णायक इनिंगमध्ये ओडिशाच्या खेळाडूंनी केरळच्या पिचिंगवर आक्रमक खेळ करत सामना आपल्या बाजूने झुकवला. ओडिशाकडून मेघनाथ माझी, आयुष्यमान, अविनाश साबरा, जॉयल, निरंजन आणि अभिजीत यांनी प्रभावी कामगिरी केली. मुलींच्या अंतिम सामन्यात पावनी, ईश्वरी प्रिया आणि श्रीदेवी यांनी आंध्रप्रदेशच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

मुलांच्या तिसऱ्या क्रमांकाच्या सामन्यात महाराष्ट्राने आंध्रप्रदेशवर निसटता विजय मिळवत कांस्यपदक पटकावले.

कुलगुरूंच्या हस्ते पारितोषिक वितरण

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते झाला. यावेळी राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप, क्रीडा व युवक सेवा विभागाचे विभागीय क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, भारतीय सॉफ्टबॉल संघटनेचे सचिव डॉ. प्रवीण अनावर, एल. आर. मौर्य, महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल संघटनेचे सचिव डॉ. प्रदीप तळवेलकर, सहसचिव प्रशांत जगताप, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. सचिन देशमुख, डॉ. फुलचंद सलामपुरे, अॅड. आशुतोष मिश्रा, प्रसेनजीत बनसोडे आणि दीपक सोनटक्के उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी गणेश बेटूदे, संतोष आवचार, रफिक जमादार, फकीरबा घोडे, सुरेश फुके, पांडुरंग कदम, भीमा मोरे, प्रशांत पांडे, गौरव साळवे, निखिल वाघमारे, राहुल जावळे, शंतनू डूमने, मयूर पाटील, स्वप्नील राठोड, बाबूभाई, एकनाथ शिंदे आणि रोहित तुपारे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सचिव गोकुळ तांदळे यांनी केले.

## समृद्धीवर गुटख्याचा पाठलाग; जयपूर टोलनाक्यावर 55 लाखांचा माल जप्त

### पोलिसांना पाहताच आयशर वेगाने पळविला; पाठलाग करून ट्रक अडवित दोघांना घेतले ताब्यात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर** : समृद्धी महामार्गावर पहाटेच्या शांततेत एक आयशर ट्रक वेगाने धावत होता. जयपूर टोलनाक्याजवळ करमाड पोलिसांनी त्याला थांबण्याचा इशारा केला; मात्र चालकाने वाहन न थांबविता भरधाव वेगाने पुढे काढले. काही क्षण पाठलाग आणि थरारक हालचालीनंतर पोलिसांनी ट्रक अडविला आणि त्यातून तब्बल ५५ लाख १९ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा उघडकीस आला.

अमरावतीहून छत्रपती संभाजीनगरकडे मोठ्या प्रमाणावर गुटखा आणला जात असल्याची माहिती करमाड पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार समृद्धी महामार्गावरील जयपूर टोलनाक्याजवळ सापळा रचण्यात आला. बुधवारी पहाटे ५.५० वाजता एमएच-४६-बीएफ-४२३५ क्रमांकाचा आयशर ट्रक दिसताच पोलिसांनी थांबण्याचा इशारा दिला. मात्र, चालकाने वाहन भरधाव पळविले. पोलिसांनी तातडीने पाठलाग करून टोलनाका एक्झिट पॉईंटजवळ ट्रकला घेरले.

ट्रकची झडती घेतली असता ३० लाख ६० हजार रुपये किमतीचा 'रॉयल ब्लेंडेड बाजीराव' सुगंधित पान मसाला आणि ४ लाख ५९ हजार रुपये किमतीची 'मस्तानी-२१६' तंबाखू आढळून आली. एकूण ३० हजार ६०० पुडे जप्त करण्यात आले. याशिवाय २० लाख रुपये किमतीचा आयशर ट्रकही जप्त करण्यात आला.

या प्रकरणी इस्माईल खैराती शेख (रा. गारखेडा) आणि अकील खलील शेख (रा. कैलासनगर, ह.मु. नारेगाव) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. प्राथमिक चौकशीत हा माल अमरावती येथील जावेद हुरूप मेमन याच्याकडून आणून छत्रपती संभाजीनगरातील मोतीकारंजा येथील अंजिठा किराणा स्टोअर्सचे मालक सय्यद वाजेद सय्यद फारुख यांच्याकडे पोहोचविण्यात येणार असल्याचे समोर आले.

करमाड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४७१/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील कलम २७५, २२३, १२३ तसेच अन्न व सुरक्षा मानके अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सम्राटसिंग राजपूत, सहायक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## भारतीय सशस्त्र दलात अधिकारी होण्याची संधी

### एसएसबी पूर्व प्रशिक्षणासाठी परभणीतील उमेदवारांच्या मुलाखती 12 ऑक्टोबरला

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,:** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होऊ इच्छिणाऱ्या पात्र युवक-युवतींसाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे सर्व्हीस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) कोर्स क्रमांक 67 आयोजित करण्यात आला आहे. हे प्रशिक्षण 19 ते 28 ऑक्टोबर 2026 दरम्यान असून, प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणासाठी परभणी जिल्ह्यातील इच्छुक पात्र उमेदवारांच्या निवडीसाठी 12 ऑक्टोबर 2026 रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, परभणी येथे मुलाखती घेण्यात येणार आहेत. निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी 18 ऑक्टोबर 2026 रोजी सकाळी 10 वाजता छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे उपस्थित राहणे आवश्यक आहे.

मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी Department of Sainik Welfare, Pune यांच्या www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या DSW Portal-Resources- PCTC Nashik-SSB 67 येथून प्रवेशपत्र व त्यासोबतची परिशिष्टे डाउनलोड करून त्यांची प्रिंट काढावी. परिशिष्टे पूर्ण भरून आवश्यक कागदपत्रांसह मुलाखतीस उपस्थित राहावे.

या पात्रतेपैकी कोणतीही एक पात्रता आवश्यक असून, एसएसबी पूर्व प्रशिक्षण वर्गात प्रवेशासाठी उमेदवाराकडे कम्बाईड डिफेन्स सर्व्हीस एक्झामिनेशन (सीडीएस-यूपीएससी) किंवा नैशनल डिफेन्स अकाडमी एक्झामिनेशन (एनडीए- युपीएससी) उत्तीर्ण होऊन सर्व्हीस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र ठरलेले असावेत. एनसीसी स्पेशन एन्ट्रीसाठी एसएसबी मुलाखतीचे कॉल लेटर असावे. टेक्नकिल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एसएसबी मुलाखतीचे कॉल लेटर असावे. युनिर्व्हसिटी एन्ट्री स्कीमसाठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबीसाठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे. संबंधित पात्रतेचे प्रमाणपत्र प्रशिक्षणासाठी उपस्थित होताना सोबत आणणे आवश्यक आहे.

या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी परभणी जिल्ह्यातील पात्र युवक-युवतींनी वेळेत मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, परभणी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्याशी ई-मेल - training.petenashik@gmail.com, दूरध्वनी 0253-2451032 किंवा व्हॉट्सअॅप 9156073306 या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, परभणी यांनी केले आहे.

## राजकुंवर विद्यालयाचा सुवर्ण ठोसा अंशू संसरेची बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदकाला गवसणी विभागीय स्पर्धेसाठी निवड



**फर्दापूर प्रतिनिधी** : फर्दापूर राजकुंवर विद्यालय, फर्दापूर येथील इयत्ता दहावीचा विद्यार्थी अंशू उमेश संसरे याने जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत आपल्या उत्कृष्ट खेळाची चुणूक दाखवत थेट सुवर्णपदक Gold Medal पटकावले आहे. त्याच्या या घवघवीत यशाबद्दल विद्यालयात त्याचा विशेष सत्कार करण्यात आला असून सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे

जिद्दीच्या जोरावर मिळवले यश

अंशूने अत्यंत कठोर मेहनत दुर्दम्य जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर बॉक्सिंग रिंगमध्ये प्रतिस्पर्ध्यांवर मात करत ही सुवर्ण कामगिरी नोंदवली आहे जिल्हास्तरावरील या सुवर्णयशानंतर आता त्याची परभणी येथे होणाऱ्या विभागीय स्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे

**मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार** : या अभिमानास्पद कामगिरीबद्दल राजकुंवर विद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ ए जे बेडवाल सर यांच्या हस्ते अंशूचा यथोचित सत्कार करून त्याचे अभिनंदन करण्यात आले या गौरव सोहळ्याला माध्यमिक विभागाचे शिक्षक एम पी सपकाळे पूनम पोळ गव्हाणे मानकर लोखंडे आणि राठोड सर यांची प्रमुख उपस्थिती होती

क्रीडा शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन

अंशूच्या या नेत्रदीपक यशामागे विद्यालयाचे क्रीडा शिक्षक तडवी सर आणि विकास चव्हाण यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले आहे आगामी विभागीय स्तरावरील स्पर्धेतही अंशूने आपले पदकांचे लक्ष कायम ठेवत अशीच दमदार कामगिरी करावी आणि राजकुंवर विद्यालयाचे नाव उज्वल करावे अशा मन पूर्वक सदिच्छा उपस्थित मान्यवरांनी आणि शिक्षकवृंदाने दिल्या आहेत

## मतदार संघात पोलीसांनी नागरिकांच्या तक्रारीची दखल घ्यावे : आ बंब

खुलताबाद प्रतिनिधी गंगापूर खुलताबाद मतदार संघातील प्रत्येक गाव वाडी शेत वस्ती येथे पोलीस गस्ता वाढवण्यासाठी छत्रपती संभाजी नगर जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण यांच्याकडे पात्राद्वारे नागरिकांच्या तक्रारीकडे त्वरित लक्ष देऊन नागरिकांना सहकार्य

करा या पत्राच्या प्रती. आपल्या मतदारसंघातील .पोलीस स्टेशन येथेही देण्यात आले आहे. पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन गंगापूर पोलीस निरीक्षक. पोलीस स्टेशन, खुलताबाद

शिल्लेगाव पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळूज पोलीस स्टेशन गंगापूर–खुलताबाद विधानसभा मतदारसंघातील झालेल्या चोऱ्यांचा तपास लावणे तसेच शेतवस्ती व ग्रामीण भागात पोलिस गस्त वाढवून चोरीच्या व इतर अनुचित घटनांना प्रतिबंध करण्याबाबत, गंगापूर–खुलताबाद विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमधील शेतकरी, शेतमजूर व नागरिकांकडून सध्या शेतवस्ती तसेच शेत परिसरातील सुरक्षिततेबाबत तक्रारी व माहिती प्राप्त होत आहे. ग्रामीण भागातील शेतवस्त्या मुख्य गावापासून दूर व विखुरलेल्या स्वरूपात असल्याने विशेषतः रात्रीच्या वेळेस चोरीच्या घटना तसेच इतर अनुचित प्रकार घडण्याची शक्यता निर्माण होते.

मतदारसंघातील विविध भागांतून अलीकडच्या काळात शेतातील कृषी साहित्य, विद्युत मोटारी, केबल, शेतीची अवजारे, पशुधन तसेच इतर साहित्याच्या चोरीबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. काही ठिकाणी शेतामध्ये बकऱ्या किंवा इतर पशुधन सोडून देऊन शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान करण्यासारखे प्रकारही निदर्शनास आले आहेत.



मी दुष्काळ दौऱ्यावर असतांना शेंदुरवादा (गट), लासुर गटातील बाभुळगांव, वाळुज परिसर, या सर्व ठिकाणी शेतकऱ्यांनी, नागरिकांनी अशा घटनांबाबत (दरोडा/चोरी) तळतळ व्यक्त केली. इतत्रत्र माहिती घेतली तेव्हा याशिवाय खुलताबाद तसेच मतदारसंघातील इतर ग्रामीण भागांतूनही शेतवस्ती व शेत परिसरातील सुरक्षिततेबाबत नागरिकांकडून तक्रारी व निवेदने प्राप्त होत आहेत.

शेतवस्तीवरील नागरिकांची सुरक्षितता तसेच शेतकऱ्यांच्या शेतीमाल, कृषी साहित्य व पशुधनाचे संरक्षण यासाठी पोलिस प्रशासनाची प्रतिबंधात्मक उपस्थिती महत्त्वाची आहे. त्यामुळे आपल्या-आपल्या पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील शेतवस्ती, शेत रस्ते, गावालगतचे निर्जन परिसर, रात्रीच्या वेळी वर्दळ कमी असलेले मार्ग तसेच दरोडा / चोरीच्या घटना घडण्याची शक्यता असलेले संवेदनशील भाग याठिकाणी नियमित व प्रभावी पोलिस गस्त वाढविण्यात यावी.

तसेच संबंधित बीट अंमलदार व पोलिस कर्मचाऱ्यांना याबाबत आवश्यक त्या सूचना देऊन शेतवस्तीवरील नागरिकांशी संपर्क व समन्वय ठेवण्यात यावा. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन, घटनांची योग्य ती नोंद करून कायद्यानुसार आवश्यक ती प्रतिबंधात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

सध्याच्या परिस्थितीचा विचार करता, ग्रामीण व शेतवस्ती भागात पोलिसांची नियमित गस्त वाढविल्यास नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यास तसेच चोरी व इतर अनुचित घटनांना प्रतिबंध करण्यास मदत होईल.

करिता, गंगापूर–खुलताबाद विधानसभा मतदारसंघातील आप-आपल्या कार्यक्षेत्रात शेतवस्ती व ग्रामीण भागातील पोलिस गस्त वाढवून आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना व कायदेशीर कारवाई करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे आमदार प्रशांत बंब यांनी केली.

## सेवा संकल्प अभियानाअंतर्गत भिमनगर आरोग्य केंद्रात 22 जणांचे रक्तदान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर:** 'सेवा संकल्प अभियान-२०२६' अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त-२ कल्पिता पिंपळे आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली आज भिमनगर आरोग्य केंद्र येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

आरोग्य अधिकारी डॉ. वैशाली मुदगडकर यांनी स्वतः रक्तदान करून या शिबिराची उत्साहात सुरुवात केली. या प्रसंगी नोडल अधिकारी डॉ. अमरज्योती शिंदे यांनी शिबिराला भेट देऊन कामाचा आढावा घेतला व उपक्रमाचे कौतुक केले.

या शिबिरात वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यामध्ये डॉ. वैशाली मुदगडकर, आयसी वर्षा जाधव, सिस्टर योगिता, शिल्पा मडीलगेकर, एएनएम मंगल गरुड, एएनएम छाया ठोके, एसएन ज्योती पोटभरे, एमपीडब्ल्यू आकाश चांदणे आणि एलटी सुमित बागुल यांनी रक्तदान केले.

त्याचप्रमाणे आशाताई धम्मदिना राऊत, मंगल किर्तीशाही, अश्विनी खरात, ज्योत्सना पाटील, प्रियंका मिसाळ, माधुरी त्रिभुवन-मुनवर, मोहिनी जोशी, जयश्री गंगावणे, कविता फुले, रुपाली धुरंधर, तसेच नेहा चव्हाण, सुरेंद्रसिंग चव्हाण, विशाल धिवर आणि आकाश चांदणे या सर्व २२ रक्तदात्यांनी रक्तदान करून एकूण २२ रक्तपिशवींचे संकलन केले.

रक्त संकलनाचे कार्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील वैद्यकीय टीमने पार पाडले. या वेळी डॉ. नसीर, डॉ. श्रृष्टी तावडे, संहीता राऊत, संतोष कांबळे, तंत्रज्ञ सुमन धुळे, सेवक बबन वाघ व वर्षा पलाटे आणि इतर कर्मचारी उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी भिमनगर आरोग्य केंद्राच्या गोविंद गिरी व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## शिंदे गटाच्या प्रणाली किशोर म्हात्रे यांचा उपसरपंच निवडणुकीत दारुण पराभव; सीमा रवींद्र ठाकूर विजयी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



उरण रायगड

जसखार गावाच्या उपसरपंच पदाच्या निवडणुका पार पडल्या त्यामध्ये युवा सामाजिक संस्थेच्या वतीने सीमा रवींद्र ठाकूर यांच्याविरुद्ध शिवसेना शिंदे गटाच्या महिला तालुका अध्यक्ष प्रणाली किशोर म्हात्रे यानी शिवसेना शिंदे गटाचे कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या काँग्रेस व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाशी हात मिळवणी करून सुद्धा युवा सामाजिक संस्थेच्या सीमा रवींद्र ठाकूर यांनी प्रणाली किशोर म्हात्रे यांचा दारूण पराभव केला. याच ग्रामपंचायतीमध्ये उपसरपंच म्हणून प्रणाली किशोर म्हात्रे ह्या कार्यरत होत्या त्यावेळी बाकी सर्व सदस्यांनी त्याच्यावर अविश्वास ठराव टाकून त्यांना पदावर हटवण्यात आले होते. तरीसुद्धा त्या पुन्हा एकदा उपसरपंच पदासाठी उभ्या राहिल्या व सत्तेच्या हव्यासा पोटी कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या पक्षांसोबत युती करून सुद्धा पराभव झाला त्यामुळे परिसरात त्यांच्याविरुद्ध अनेक तर्क वितरक लावले जात आहेत.

तसेच नवनिवार्चीत उपसरपंच सीमा रवींद्र ठाकुर यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव सुरू आहे. सीमा रविंद्र ठाकूर यांनी या विजयाचे श्रेय ग्रामपंचायत सदस्य राकेश तांडेल आणि सचिन घरत तसेच युवा सामाजिक संस्थेच्या संपूर्ण टीम ला दिले आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911